दैनिक **वादळ वार्ता**

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

vadalvartanews@gmail.com ●संपादक : अजय भांगे ●उपसंपादक : गणेश गाडेकर https://epaper.vadalvarta.com

● बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी ● सोमवार दि.२१ जुलै २०२५ 9422660077 ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ रे ● अंक २३५ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

● Beed (Mahmar) Daily Marathi ● Monday 21 July 2025 9422660077 ● RNI-MAHMAR / 2023 / 87555 ● Year - 2nd ● Issue 235 ● Pages 4 ● Rate 4 Rs



**प्रतिनिधी नेमणे आहे**

लोकप्रिय विभागीय दैनिक वादळ वार्ता साठी महाराष्ट्रात सर्वत्र जिल्हा , तालुका , सर्कल व गावस्तरावर प्रतिनिधी नेमणे आहे. तरी इच्छुकानी मो.न.9422660077, 9766440025 संपर्क साधावा .


# राज्यातील शेतकरी त्रस्त मात्र कृषी मंत्री मोबाईल रम्मी खेळण्यात मस्त!

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे हे त्यांच्या वादग्रस्त विधानांमुळे अनेकदा वादात अडकले आहेत. आता विधिमंडळाचे पावसाळी अधिवेशन नुकतेच संपले असून, या अधिवेशनात ते सभागृहातच मोबाईलवर रमी गेम खेळत असल्याचा एक व्हिडीओ समोर आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी हा सदर व्हिडीओ एक्सवर शेअर केला होता. एकीकडे राज्यातील शेतकरी दशकाळाच्या खाईत आणि कर्जाच्या डोंगराखाली दडपून त्रस्त असल्याचे चित्र असताना दुसरीकडे राज्याचे कृषिमंत्री मोबाईलवर रमी गेम खेळण्यात व्यस्त असल्याचे पाहावयास मिळाल्याने बळीराजाने आपल्या व्यथा कुणाकडे मांडायच्या असा यक्ष प्रश्न शेतकऱ्यांसमोर आहे. या घटनेवरुन सर्वच विरोधी पक्षांकडून कोकाटे यांच्यावर टीका होताना दिसत आहे. शेतकरी कामगार पक्षानेदेखील कृषीमंत्र्यांच्या सभागृहातील मोबाइलवर रमी गेम खेळण्याच्या प्रकाराचा निषेध केला आहे.सत्तेतल्या राष्ट्रवादीला कुठलीही गोष्ट भाजपला विचारल्याशिवाय करता येत नाही. सध्या राज्यात शेतीचे असंख्य प्रश्न प्रलंबित आहेत. त्यासोबतच राज्यात दररोज आठ शेतकरी आत्महत्या करत असून तरीदेखील यांना निर्णय घेता येत नाही. कारण प्रत्येक गोष्ट भाजपला विचारावी लागते. त्यामुळे आता हातात काहीच काम शिल्लक नसल्याने कृषीमंत्री माणिकराव कोकाटे सभागृहात बसून रमी खेळत असल्याची खोचक टीका रोहित पवार यांनी केली आहे.कृषीमंत्री महाराष्ट्रात जुगाराचं पिक पेरण्यात व्यस्त आहेत. त्यांची फळं महाराष्ट्रातील तरुण पिढी आणि बळीराजा भोगत आहे. महाराष्ट्र विधानसभेचा बहुमुल्य वेळ मंत्री महोदय सत्कारणी लावताना पाहून राज्याची खूपच प्रगती झाली आहे असे वाटत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी लवकरच या मंत्र्यांना आता काम नसल्यामुळं घरी बसवायला हरकत नाही, अशी टीका मनसेचे नेते यशवंत किल्लेदार यांनी माणिकराव कोकाटे यांच्यावर केली आहे.मी विधानपरिषदेत कामकाजासाठी बसलो होतो. तेव्हा सभागृह काही वेळासाठी तहकूब झाले असावे. म्हणून मी खालच्या सभागृहात काय कामकाज सुरू आहे, हे पाहण्यासाठी युट्यूबवर गेलो होतो. युट्यूबवर व्हिडीओ सुरू केल्यानंतर जाहिराती येत असतात. त्याप्रमाणेच त्यावेळी सदर जाहिरात आली. मी जाहिरात स्किप करून पुढे गेलो. पण व्हिडीओ व्हायरल करणाऱ्यांनी फक्त १८ सेकंदाचाच व्हिडीओ दाखवला, असे स्पष्टीकरण राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिले आहे. माणिकराव कोकाटे राज्याचे जबाबदार मंत्री आहेत. त्यांनी व्हायरल व्हिडीओवर स्वतः खुलासा केला आहे. त्यांना काही सूचना द्यायच्या असतील तर त्या देईल, अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी दिली.





**राज्यात कर्ज माफीचे आश्वासन देऊनही त्याची पुर्तता करण्यात आली नाही. सरकारच्या या भूमिकेबाबत शेतकरी प्रचंड नाराज आहेत. सभागृहातील या प्रकारामुळे कृषीमंत्री गांभीर्याने घेत नसल्याचे दिसून येत आहे. राज्याला अभ्यासू व शेतकऱ्यांबद्दल आस्था असणारा मंत्री असणे आवश्यक आहे. त्यामुळे कोकाटे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी होत आहे.**

**–जयंत पाटील,शेकाप सरचिटणीस**



**कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानसभा सभागृहात मोबाईलवर रमी खेळतानाचा व्हिडिओ भरपूर व्हायरल होत आहे. एकीकडे शेतीमालाला हमीभाव नाही, शेतकरी आत्महत्या करत आहेत आणि दुसरीकडे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे मोबाईलवर रमी खेळत आहेत ही लाजिरवाणी गोष्ट आहे. महाराष्ट्राची संस्कृती ही शेतीशी घट्ट जोडलेली आहे, वारंवार शेतकऱ्यांच्या श्रमाचा अपमान करणारे, शेतकाऱ्यांबद्दल आपुलकी नसलेले कृषिमंत्री कोकाटे यांचा शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने जाहीर निषेध !**

**–चित्रलेखा नृपाल पाटील,शेकाप प्रवक्त्या**

## उपमुख्याध्यापक अरुण कांबळे यांना पीएच.डी.

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील शिंदी येथील मूळ रहिवासी तथा छत्रपती संभाजीनगर येथील जय भवानी विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाचे उपमुख्याध्यापक अरुण लक्ष्मणराव कांबळे यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने 'महात्मा फुले – डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचारधारा' या विषयात पीएच.डी. पदवी प्रदान केली .डॉ. डी. व्ही. शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'डॉ.बाबसाहेब आंबेडकर व अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील वैज्ञानिक दृष्टिकोन: एक अभ्यास (१९२० ते १९७० )' या विषयावर त्यांनी शोध प्रबंध सादर केला आहे. अरुण कांबळे हे गेल्या ३३ वर्षापासून इंग्रजी विषयाचे अध्यापन करत आहेत. ते इंग्रजी विषयाचे राज्यस्तरीय तज्ञ मार्गदर्शक , लसाकम या सामाजिक संघटनेचे राज्य प्रवक्ते आहेत . त्यांचा अनिगुत काव्यसंग्रह प्रसिद्ध आहे . मासिक लहूशक्ती, मासिक तथागत चे त्यांनी अनेक वर्ष संपादन केले आहे .विविध विषयांवर अनेक वर्तमानपत्रातून त्यांचे लेख प्रकाशित झाले आहेत. स्काऊट गाईड चळवळीच्या माध्यमातून आय.एस.टी. म्हणून ते जपान येथे २३ व्या आंतरराष्ट्रीय जांबोरी त सहभागी झाले होते. शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात त्यांचे भरीव योगदान आहे. २६ जून रोजी नुकतेच त्यांना राजर्षी शाहू महाराज समाज भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांच्या या यशाबद्दल जय तुळजाभवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. नामदेवराव गाडेकर , सचिव रंगनाथराव जाधव सदस्य शिवाजी देवरे, प्राचार्य डी.एस.जाधव ,पर्यवेक्षिका बी.एस . हिवरेकर , प्रो.डॉ.दिलीप अर्जुने, प्रो.डॉ.सुनिल नरवडे , डॉ.एम.जी.सदामते, प्राचार्य कमलाकर कांबळे, प्राचार्य बी.जी. खोडवे, प्राचार्य ए. के. वाघ , एन.एम. राठोड ,एस. पि. चेपट, ए . बी. जाधव, एम.एस.रांजणीकर , किशोर गेडाम एन.जे.पठाण,मधुसूदन कांडलिकर ,सुशील कुंबेफळकर , डॉ . गणेश गावंडे, प्रा.डॉ. मारोती गायकवाड,के. ई. हरिदास, माजी न्या. डी. आर. शेळके, श्रावणदादा गायकवाड, डॉ . भारत सोनवणे,प्रा. अरुण चंदनशिवे , अँड. वसंत शेजुळ आदींनी त्यांचे अभनंदन केले.



## जिल्ह्यातील दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी कर्त्रीम अवयव शिबिराचा लाभ घ्यावा–शाहु डोळस

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकसभा मतदार संघातील खासदार बजरंग सोनवणे यांचे संकल्प नेतून बीड मतदार संघातील दिव्यांग,जेष्ठ नागरिक यांना सुविधा मिळवून देण्यासाठी दिनांक १८/७/२०२५ला शिबिराचे उदघाटन मा खा बजरंग (बप्पा )सोनवणे यांनी केले आहे ते ३०जुलै २०२५ पर्यंत चालणार आहे. या मध्ये दिव्यांगा साठी जयपुरी फूट, करत्रिम हात, कालिपर, व्हीलचेअर, ड्रायशिकल, क्रचेसं, वार्किंग स्टिक,अंधासाठी बेलकीत, स्मार्ट फोन, काठ्या, चस्मे,जेष्ठ नागरिकां साठी करत्रिम दात,खुबड, करत्रिम अवयव,श्रवण यंत्र,व्हील केअर कमोडसहित, सिलीकोण, खोम तकीया, निब्रेस स्पयनल सपोर्ट, सरवायकल कॉलर,कानची मशीन ह्या सर्व साहित्यासाठी दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी आपल्या पंचायत समिति येथे आपली योग्य तपासणी करून आपण जे अवयव निश्चित करावे तरी बीड जिल्ह्यातील दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी सकाळी १०ते सायंकाळी ६ पर्यंत उपस्थित राहून संधीचा फायदा घ्यावा.

२१जुलै २०२५ बीड, २२जुलै २०२५ माजलगाव, २३जुलै २०२५ पाटोदा, २४ जुलै २०२५ वडवणी, २५जुलै २०२५ आस्टी, २६जुलै २०२५ धारूर, २८जुलै २०२५ परळी वै, २९जुलै २०२५ शिरूर का, ३०जुलै २०२५ गेवराई वरील तखेला दिव्यांगणी दिव्यांग प्रमाणपत्र,णऊखऊकार्ड, आधार कार्ड उत्पनचे प्रमाणपत्र, राशन कार्ड,तसेच जेष्ठ नागरिकांसाठी आधार कार्ड, उत्पन्न १,८०,००० च्या आत घ्यावे, तरी बीड जिल्ह्यातील दिव्यांग व जेष्ठ नागरिकांनी या शिबिराचा जास्तीत जास्त फायदा घ्यावा असे आवाहन रिपाई दिव्यांग आघाडी जिल्हा बीड चे जिल्हाध्यक्ष शाहु डोळस यांनी केले आहे.



## नुसते मेळावेच काय घेता, बीडचा विकास कधी करणार?–नितीन जायभाये

### तुमच्या मेळाव्यांच्या नौटंकी पेक्षा बीडकरांच्या मूलभूत सुविधांचे व विकासाचे प्रश्न ज्वलंत नाहीत का? बीड शहर बचाव मंचाचा संतप्त सवाल

**बीड । प्रतिनिधी**

तुमच्या कार्यकर्त्यांचे रुसवे-फुगवे काढणे हेच इतके महत्त्वाचे आहे का ?. तुम्हा सत्ताधाऱ्यांना तुमच्या कार्यकर्त्यांचे रुसवे फुगवे दिसतात पण बीड करांच्या ज्वलंत अडचणी, डोळ्यातले अश्रू का दिसत नाहीत ? कार्यकर्त्यांची दशा- दिशा पाहण्यासाठी येणाऱ्या सत्ताधारी नेत्यांना बीड शहराची दुर्दशा व नगरपालिकेच्या गलथान कारभाराची दिशा दिसत नाही का ?. बीड शहराच्याविकासाची दशा व दिशा कळत नाही का ? बीडची जनता नानाअनंत समस्यांना रोज झुंजत आहे. प्रश्न सुटत नाहीत. सुटण्याचा काही मार्ग दिसत नाही. समस्या सोडविण्यासाठी कोणी वाली नाही. एकीकडे प्रशासकीय अधिकाऱ्यांची मनमानी व भ्रष्टाचाराचा कळस उभा राहिला आहे. दुसरीकडे नेते पुढारी बीड च्या स्थानिक स्वराज्य संस्थांना लोचून-लुचून खात आहेत. नेत्या पुढाऱ्यांनी, मोठमोठ्या घराण्यांच्या राजपुत्र वारसांनी भ्रष्टाचाराचा कहर माजवला आहे. आई-बहिणीच्या अब्रूंची किंमत राहिली नाही. बीड जिल्ह्यात महिलांवरील अत्याचारांना काही सीमाच उरलेली नाही. आया - बहिणींवरील अत्याचारांचे दररोज नवनवीन प्रकरणे उघडकीस येताना दिसत आहेत. कायदा-व्यवस्थेचा धाकच राहिलेला दिसत नाही. विकासाची कामे रेंगाळत चाललेली आहेत. रेंगाळलेल्या रस्त्यांच्या कामांमुळे अपघातांचे प्रमाण प्रचंड वाढलेले आहे . अपघातांमध्ये माणसं दगावत आहेत, महिला, मुले, मुली, वृद्ध व जेष्ठ नागरिकांना अपघात ग्रस्त होऊन अक्षरशः अपंगत्व येत आहे. बीड शहरातील सर्व प्रशासकीय कारभाराचे तीन तेरा नऊ बारा वाजलेले आहेत . याला भ्रष्टाचारी अधिकारी व नेते पुढारी सर्वस्वी कारणीभूत आहेत. हे सर्व प्रश्न सोडवण्यापेक्षा सत्ताधारी नेत्यांना कार्यकर्त्यांचे रुसवे फुगवे काढणे 'हेच' महत्त्वाचे वाटते, निवडणुका आल्यामुळे पक्ष बांधणी महत्त्वाची वाटते, पण विकासाची बांधणी करताना तुम्ही नेहमीच कमी पडताना दिसता किंवा तुम्हाला लोकांच्या हाती नेहमी गाजराची पुंगीच द्यायची असते. नुसताच आश्वासनांचा बडीमार , जुमलेबाजी आणि प्रत्यक्ष विकास कामांच्या नावाने शंख हीच तुमची कार्यपद्धती झालेली आहे. पण याचे दुष्परिणाम, त्यातून निर्माण येणाऱ्या हालअपेष्टा निष्पाप आणि करदात्या जनतेला सहन कराव्या लागतात हाच आपल्या विकास कार्यक्रमांचा खरा लेखाजोखा आहे . कधी विकासावरही चर्चा करा, विकासासाठी मेळावे घ्या, भ्रष्टाचार संपवण्यासाठी ही मेळावे घ्या, असे बीड शहर बचाव मंच तुम्हाला आज आव्हान करत आहे. बीड शहराच्या नगरपालिकेची दशा आधी सुधारित करा , नेते पुढारी व अधिकाऱ्यांची मिली भगत संपवून शहराला चांगला कारभार बहाल करा, नगरपालिकेतील भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करा, नेते पुढारी व अधिकाऱ्यांनी कोलमडवलेली नगरपालिकेची यंत्रणा व कारभार पारदर्शक आणि सुरळीत करून द्या असे बीड शहरातील जनतेच्या वतीने बीड शहर बचाव मंच सत्ताधारी नेत्या पुढार्यांना व अधिकाऱ्यांना आव्हान करत आहे.



## केज मध्ये दरोड्यातील तीन आरोपी जेरबंद एक फरार

**केज । गौतम बचुटे**

केज शहरात एका तरुणास चौघांनी मारहाण करीत त्याच्या हातातील चांदीचे ब्रासलेट, कानातील सोन्याची बाळी, मोबाईल आणि नगदी ८ हजार रुपये लुटल्याच्या दरोड्यातील आरोपी पैकी तीन आरोपींना केज पोलिसांनी जेरबंद केले आहे.

या दरोड्याच्या घटनेची माहिती अशी की, केज शहरातील यश महादेव हजारे हा तरुण १२ एप्रिल रोजी रात्री १२:०० वाजेच्या सुमारास भीम जयंतीच्या कार्यक्रमासाठी त्याचा मित्र शंकर हजारे यास घेऊन येण्यासाठी कळंब रस्त्यावरील संतोष पॅलेस समोर दुचाकीवर गेला. त्या ठिकाणी साबेर अनवर शेख, आवड्या खाजा शेख, सोहेल शेख, विशाल उर्फ बाळा रामभाऊ गायकवाड (रा. अजिजपुरा, केज) हे त्याला म्हणाले की, त्यांच्याकडे एक दुचाकी असल्याने तुझ्या दुचाकीवर एक जणास सोड असे म्हणाले. त्यानंतर सोहेल शेख यास घेऊन दुचाकीवर घेऊन तो छत्रपती शिवाजी महाराज चौकात आला असता त्यास पंचायत समितीच्या पाठीमागील मैदानावर सोड म्हणून तिकडे अंधार घेऊन गेले. त्या ठिकाणी या चौघांनी त्याला शिवीगाळ करून मारहाण केली. तसेच त्याला चौघांनी घेराव घालून हातातील २ हजार पाचशे रुपयांचे चांदीचे ब्रासलेट, ६ हजार रुपयांची कानातील सोन्याची बाळी, २० हजार रुपयांचा मोबाईल आणि खिशातील ८ हजार रूपये जबरदस्तीने हिसकावून घेतले. त्यांना विरोध केला असता त्या चौघांनी त्याला पुन्हा मारहाण करीत दुचाकीची चावी काढुन घेतली आणि जिवे मारण्याची धमकी देऊन निघून गेले. त्या नंतर यश हजारे याने केज पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारी वरून चौघा विरुद्ध गु. र. नं. १५०/२०२५ भा. न्या. सं. ३०९(४), ३(५) साबेर शेख, आवड्या शेख, सोहेल शेख, विशाल उर्फ बाळा गायकवाड या चौघां विरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे हे करीत होते.दरम्यान त्या नंतर या प्रकरणी पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी या दरोड्याच्या तपास सुरू केला. संदीप मांजरमे यांच्याकडे तपास वर्ग झाल्या नंतर त्यांनी गुप्त खबऱ्या मार्फत आरोपींची माहिती काढून पोलीस नाईक प्रकाश मुंडे आणि हनुमान मुंडे यांच्या मदतीने साबेर शेख, आवड्या शेख, सोहेल शेख या तिघांना वेगवेगळ्या ठिकाणाहून ताब्यात घेत बेड्या ठोकल्या. तर या दरोड्यातील विशाल उर्फ बाळा गायकवाड हा अद्याप फरार असून त्याच्या सुद्धा लवकरच मुसक्या आवळल्या जाणार असल्याचा विश्वास सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप मांजरमे यांनी व्यक्त केला आहे.





**माहिती व जनसंपर्क माहसंचालनालय जिल्हामाहिती कार्यालय बीड तर्फे आयोजित पत्रकारांची कार्यशाळा या ठिकाणी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना शासनाकडे वृत्तपत्रांच्या थकीत बिला बाकी संदर्भात व वाढत्या बीड जिल्ह्यातील परळी शहरातील चोऱ्या संदर्भात जिल्हाधिकारी निवेदन देऊन चर्चा करताना संपादक बालाजी जगतकर, प्रदीप कुलकर्णी, नितेश उपाध्ये, आयेशा शेख अदि दिसत आहेत.**

## मस्साजोग येथे बियरबार फोडले; दीड लाखाचा मुद्देमाल लंपास

**केज । गौतम बचुटे**

केज तालुक्यातील मस्साजोग येथे अज्ञात चोरट्यांनी बियरबार व गोडाऊनचे कुलूप तोडून नगदी ४५ हजार ७०० रुपये व ५६ हजार ३०० रुपयांची विदेशी दारू, सीसीटीव्हीचा डिव्हीआर असा १ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना मस्साजोग (ता. केज) येथे २० जुलै रोजी सकाळी उघडकीस आली.

मस्साजोग ता. केज येथील बालासाहेब कुंडलिक गायकवाड यांचा भाऊ हॉटेल अभिषेक बियरबार चालवीत असून १९ जुलै रोजी रात्री १० वाजता बार बंद केले.. त्या नंतर अज्ञात चोरट्यांनी बार आणि गोडाऊनचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. काउंटर मधील ४५ हजार ७०० रुपयांची रक्कम काढून घेतली. ५७ हजार ६०० रुपयांचे रॉयल स्टँग कंपनीच्या विदेशी दारूचे ६ बॉक्स, ४० हजार ८०० रुपयांचे इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या विदेशी दारूचे ५ बॉक्स, ४ हजार रुपयांच्या मॅकडॉल नं. १ कंपनीच्या विदेशी दारूच्या २५ बॉटल, नऊशे रुपयांचे टुबबर्ग कंपनीचे ६ कँन, तीन हजार रुपयांचा सीसीटीव्हीचा डिव्हीआर असा १ लाख ५२ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन चोरट्यांनी पोबारा केला. बालासाहेब गायकवाड यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्यांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. तपास पोलिस उपनिरीक्षक सय्यद जावेद कराडकर हे करीत आहेत.

संपादकीय

# लोहमार्गावरचे जीवघेणे कोंडवाडे



मुंबईच्या उपनगरी रेल्वेतील जीवघेणी गर्दी आणि गैरव्यवस्थापन वारंवार प्रवाशांच्या जीवावर बेतते आहे. दिवा-मुंब्रा येथे झालेल्या अपघाताने रेल्वे प्रशासनाच्या ढिसाळ कारभारावर प्रकाश टाकला आहे. अपुऱ्या सुविधा, रखडलेले प्रकल्प आणि लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष यामुळे प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

महामुंबईची जीवनवाहिनी असलेली उपनगरी रेल्वे ही प्रत्यक्षात जीवघेण्या कोंडवाड्यांप्रमाणेच असते, याचा दाहक प्रत्यय आठवड्याच्या प्रारंभीच आला. दिवा-मुंब्रा या मध्य रेल्वेवरील गर्दीच्या स्थानकांदरम्यान कसारा लोकलमध्ये झालेल्या अपघातात उमद्या वयातील कमावती माणसे मरणाच्या दारात फेकली गेली. त्यातून वाचले त्यांनाही आयुष्यभराची झुंज चुकलेली नाही. उपनगरी रेल्वेप्रवाशांनी कायम कोंडवाड्यात कोंबलेल्या गुरा-ढोरांप्रमाणेच प्रवास करावा, असे सर्वांनी गृहीत धरले आहे काय? उपनगरी रेल्वेतून दिवसाला सरासरी सहा ते सात जणांचा मृत्यू ओढवतो. लोकलच्या फुटबोर्डावरून प्रवास करणे हा रेल्वे कायद्यानुसार गुन्हा धरला जातो; परंतु असा प्रवास करण्यास रेल्वेची गैरव्यवस्थाच भाग पाडते.

अपघातानंतर सर्व उपनगरी गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसविण्याची घोषणा रेल्वेने करून टाकली. जिवाच्या सुरक्षेसाठी तसे करायलाही हरकत नाही. परंतु अशा दरवाजामुळे विलंब होऊन प्रवाशांच्या वाट्याची एखादी गाडी कमी होऊ शकते किंवा प्रवासी वाहून नेण्याची क्षमता. त्यामुळे सरकत्या दरवाजाची घोषणा कुचकामीच ठरण्याची शक्यता अधिक.

रेल्वेच्या बाबतीत कोणतीही दुर्घटना ही 'क्सिडेंट वेटिंग टू हॅपन' म्हणजेच 'हे तर कधीही घडू शकले असते,' या स्वरूपाची असते. गेल्या काही वर्षांत ठाण्यापासून पुढे कल्याण, बदलापूर, अंबरनाथ तसेच ट्रान्सहार्बर मार्गावर वाशी, पनवेलपर्यंत आणि पश्चिम उपनगरांत विरार-डहाणूपर्यंत प्रवासीसंख्या कमालीची वाढली आहे. तीन वर्षांपूर्वी ठाणे ते दिवादरम्यान दोन मार्गिका नव्याने टाकण्यात आल्या. पाचव्या-सहाव्या ट्रॅकमुळे ठाणे-कल्याण मार्गावर फेऱ्या वाढतील, ही प्रवाशांची अपेक्षा मात्र फोल ठरली. ज्या काही गाड्या वाढविल्या, त्यापैकी बहुतेक गाड्या पूर्वीच्या गाड्यांच्या बदल्यात वातानुकूलित, इतकाच काय तो बदल झाला. तोही प्रवाशांच्या जिवावर उठणाराच ठरला. पारसिक टेकडीवर जीव धोक्यात घालून लोक राहतात. न करो, परंतु इथे दुर्घटना घडल्यास, पारसिकच्या बोगद्याचे तोंडच बंद होऊ शकते. गेल्या १२ वर्षांत १५ डब्यांच्या गाड्यांच्या फेऱ्यात वाढ झालेली नाही.

ट्रान्सहार्बर मार्गावर दिघा रेल्वेस्थानकाची उभारणी रडतखडत झाली; परंतु बेकायदा झोपड्यांपायी हा रेल्वेमार्ग कळव्याला जोडण्याचे काम रखडले आहे. साहजिकच ठाण्याचे दहाही फलाट तिन्हीत्रिकाळ गर्दीने ओसंडून वाहत असतात. या परिसरातील आमदार, खासदार व नेतेमंडळी केवळ झोपड्यांच्या रदबदलीसाठी आंदोलने करतात. समस्येवर ठोस तोडगा सुचवत नाहीत. गेल्या अनेक वर्षांपासून मुंबई व महाराष्ट्राच्या खासदारांनी आणि नेतेमंडळींनी उपनगरी रेल्वेचे प्रश्न दिल्लीदरबारी किती गांभीर्याने लावून धरले, हा संशोधनाचा विषय ठरेल. रस्त्यांच्या प्रकल्पांचे आकडे हजारो कोटींच्या घरात असतात, उपनगरी रेल्वे प्रकल्प कमी खर्चाचे असतात, हे त्याचे कारण असावे काय?

कोव्हिडनंतर उपनगरी रेल्वेने पुन्हा ७० लाखांच्या प्रवासीसंख्येपर्यंत मजल मारली आहे. परंतु, लोहमार्ग पाण्याखाली जावोत किंवा ओव्हरहेड वायर तुटो; लोकलमध्ये बसलेल्या प्रवाशांना त्याची माहिती मिळण्याची सुतराम शक्यता नसते. इंडिकेटरवरील वेळांशी तर लोकलच्या वक्तशीरपणाचा छत्तीसचा आकडा असतो. उद्घोषणेद्वारे माहिती देण्याची प्रशासनाला गरज वाटत नाही. एकेका लोकलला होणारा विलंब म्हणजे गर्दी वाढल्याने प्रवाशांच्या जिवाशी खेळच असतो. गळकी छपरे, बंद पंखे, रखडलेले पूल हे तर प्रवाशांच्या पाचवीलाच पूजलेले.दिवा-मुंब्रासारख्या घटना घडल्यास मध्य रेल्वेच्या महाव्यवस्थापकांनी प्रश्नांना सामोरे जायला हवे. शाही आणि सुस्त कारभाराची सवय जडलेल्या रेल्वे अधिकाऱ्यांनी स्वतः बदलापूर किंवा नालासोपाऱ्यातून दुसऱ्या वर्गाने रांगेत तिकीट काढून गर्दीच्या वेळी किंवा मेगाब्लॉकच्या दिवशी प्रवास करावा, तरच त्यांना प्रवाशांच्या यातनांची जाणीव होईल. गर्दीच्या वेळी तर तिकीट तपासनीसही गाडीत शिरायला धजावत नाहीत. स्वच्छतेच्या बाबतीत तेवढे रेल्वेला आपण गुण देऊ शकतो. मात्र रेल्वेचे प्रगतिपुस्तक धुळीस मिळविण्यासाठी आपले नागरिक सज्ज आहेत. मग रेल्वेची शक्ती लोहमार्गाच्या कुंपणावर जाळ्या लावण्यात खर्ची होते.

मुंबईतील लोंढ्यांवरून हाकारे देणाऱ्यांपासून ते वाहतुकीच्या समृद्धीचे गुणगान करणाऱ्यांपर्यंत कोणत्याही राजकारण्यांनी मुंबईच्या उपनगरी रेल्वेच्या प्रश्नांचा सज्ञडपणे व सातत्याने पाठपुरावा केलेला नाही. कार्यालयांच्या वेळा बदलण्याचा उत्साह काही दिवस टिकला; परंतु त्यातून लक्षणीय काही हाती लागलेले नाही. लोकलच्या गर्दीत लळत-लोंबत प्रवास करणारे कर्मचारी महापालिका, मंत्रालय, पोलिस आणि खासगी आस्थापनांची कार्यालये गाठतात. मात्र मुकी बिचारी कुणीही हाका, अशी त्यांची केविलवाणी स्थिती आहे.

# लोकलची जीवघेणी गर्दी, निरपराध प्रवाशांचे बळी

मुंबईची विस्तारीत उपनगरे असलेल्या दिवा-मुंब्रा दरम्यान खचाखच गर्दीने धावणाऱ्या लोकलमधील दरवाजात उभे असणारे काही प्रवासी खाली पडले आणि त्यातच काहींचे बळी गेले तर काही जखमी झाले. सोमवार हा आठवड्याचा पहिला दिवस. या दिवशी मुंबईतील उपनगरी रेल्वेगाड्या तुडुंब गर्दीला घेऊन धावत असतात. मध्य रेल्वेच्या मुंब्रा स्थानकाजवळ दोन लोकल गाड्यांतील दरवाजात उभे असलेले प्रवासी एकमेकांना घासले गेले, त्यातूनच काही जण खाली पडले व ही दुर्घटना घडली अशी माहिती सुरुवातीला पुढे आली. नेमके किती मृत्युमुखी पडले किंवा नेमके किती जखमी झाले याची माहितीसुद्धा धड मिळत नव्हती. मुंबईच्या उपनगरी रेल्वेतून रोज पंचाहत्तर लाखांहून अधिक प्रवास करतात.



एवढ्या संख्येने प्रवाशांना घेऊन धावणारी क्षमता जगात कुठेही नसावी. रात्रीचे चार तास सोडले तर सीएसटी-चर्चगेटपासून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेल आणि विरार, पालघर, डहाणूपर्यंत लोकल्स धावत असतात. मध्य, पश्चिम, हार्बर मार्गावरील उपनगरी सेवा ही तर मुंबईची जीवनवाहिनी आहे. आता मेट्रो, मोनो मुंबईकरांची अत्यावश्यक सेवा बनली आहे. लोकल्स आणि मेट्रो हा मुंबईकरांचा श्वास आहे. मग ही सेवा चोवीस तास तत्पर व कार्यरत ठेवणे हे जसे रेल्वेला आव्हान आहे तर रेल्वेचे कर्तव्यही आहे. याच महामुंबईतून देशाच्या खजिन्यात सर्वात जास्त महसूल जमा होतो. याच महानगरातून देशाला सर्वात जास्त जीएसटी मिळतोय. त्या बदल्यात रेल्वे मंत्रालय ७५ लाख मुंबईकरांचा रोजचा लोकल प्रवास सुखाचा व्हावा म्हणून काय सेवा सुविधा देते?

मध्य आणि पश्चिम रेल्वेवरील दादर, कुर्ला, घाटकोपर, ठाणे, कळवा, डोंबिवली, कल्याण तसेच अंधेरी, वसई-विरार या स्थानकांवर नेहमीच गर्दीचा कहर असतो. सीएसटीवरून कर्जत, कसारा, खोपोली, पनवेलला जाणाऱ्या व येणाऱ्या लोकल्स तुडुंब गर्दीने नेहमीच भरलेल्या असतात. कोंडवाड्यात जशी जनावरे दावणीला असतात, त्याहीपेक्षा लोकलमधील प्रवाशांची अवस्था वाईट असते. मुंब्रा येथे कसाराहून सीएसटीकडे जाणारी व सीएसटीहून कसाराकडे जाणारी या लोकल जात असताना दरवाजात उभे राहून लटकून प्रवास करणारे एकमेकांना घासले गेले व त्यातले डझनभर खाली पडले असे सांगण्यात आले.

धावत्या लोकलमध्ये प्रवाशांना स्वत:चा तोलही सांभाळता आला नाही, जे खाली पडले त्यांना धरून किंवा खेचून पुन्हा डब्यात आणणे इतरांना शक्य झाले नाही. या अपघातात कुणी किती जखमी झाले, कोणाचे हात-पाय मोडले, कुणाला जीव गमवावा लागला याचा तपशील नंतर येईलच, पण गर्दीने भरलेल्या लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडले ही बाब अतिशय गंभीर आहे. ही वेळ त्यांच्यावर का आली, त्याला जबाबदार कोण? याचे उत्तर कोणी देणार नाही. देशात जिकडे तिकडे वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होत आहे. वंदे भारत ट्रेनची क्रेझ वाढत आहे. पण मुंबईतील लोकल्समधून रोज प्रवास करणारे लाखो प्रवासी मात्र वाऱ्यावर सोडले आहेत. रोज पोटापाण्यासाठी व रोजगारासाठी लक्षावधी मुंबईकर गर्दीने भरलेल्या लोकल्समधून दोन-अडीच तास प्रवास करीत कामावर पोहोचत आहेत आणि त्याच गर्दीतून सायंकाळी-रात्री घरी परतत आहेत.

गर्दीचे दुष्टचक्र संपणार कधी? लोकल प्रवाशांना दिलासा कधी? लोकलमधून मुंबईकरांना कधी सुखाने प्रवास करायला मिळणार? सर्वसामान्य लोक कोणीही हौस म्हणून लोकलने प्रवास करीत नाहीत. स्वस्तात व जलद प्रवास करता येतो म्हणून लाखो लोक लोकल्स प्रवासाकडे आकर्षित होतात. गेल्या दोन वर्षांत एअर कंडिशन्ड लोकल्स धावू लागल्या आहेत. जशी त्यांची संख्या वाढत आहे तसे विना एसी लोकल्स कमी होत आहेत. मुंबईत एसी लोकल्स हव्या आहेत, त्याला मागणीही बरीच आहे. एसी लोकल्समधून प्रवास करणारा वर्गही मोठ्या संख्येने आहे. पण सर्वसाधारण लोकल परवडते म्हणून त्या लोकलने प्रवास करणाऱ्या लाखो मुंबईकरांवर अन्याय होता कामा नये याची दक्षता रेल्वे प्रशासनाने घेतली पाहिजे.


गेल्या वीस वर्षांत मुंबईत झालेल्या रेल्वे अपघातात ५१,८०२ लोकांचा मृत्यू झाला. मुंबईत रेल्वे अपघातात रोज सात ते आठ लोक मरण पावतात. पण त्याची कुठे बातमीही प्रसिद्ध होत नाही. 'रोज मरे त्याला कोण रडे' अशी मुंबईच्या उपनगरी रेल्वेची अवस्था झाली आहे. सन २०२५ या नवीन वर्षात जानेवारी ते मार्च या तीन महिन्यांत मुंबईत रेल्वे अपघातात ६६३ लोक ठार झाले. त्यातले २७२ जण लोकलमधून खाली पडून मरण पावले, तर ३९१ जण रेल्वे रूळ ओलांडताना मृत्युमुखी पडले. दोन लोकलमधील प्रवासी एकमेकांना घासून खाली पडून मरण पावले किंवा जखमी झाले, असे प्रथमच घडले असावे. आता तरी राज्य सरकार, केंद्र सरकार व रेल्वे प्रशासन यांचे डोळे उघडणार आहेत की नाही? मुंबईतील लोकल प्रवासावर कोणाचे नियंत्रण आहे की नाही? प्रत्येक ट्रेनमध्ये प्रत्येक लोकलच्या डब्यात विनातिकीट अनेक प्रवासी असतात.

प्रथम श्रेणीच्या डब्यातही विनातिकीट लोकांची अगदी महिलांचीही बरीच गर्दी असते. आपल्याला तिकीट कोणी विचारायला येणार नाही याची त्यांना खात्री असते. विनातिकीट प्रवासी हे दैनंदिन पासधारकांना रोजची डोकेदुखी असते पण धावत्या लोकलमध्ये डब्यात येऊन तिकीट तपासणी जवळपास बंदच झाली आहे. मध्य व पश्चिम रेल्वेचे टीसी जातात कुठे हा पासधारकांना रोज प्रश्न पडलेला असतो. भिखारी, फेरीवाले, विक्रेते, डब्यात गलिच्छ फडकी मारून सफाई केल्याचा आव आणणाऱ्यांची गर्दी भरपूर असते.

हातात तान्हे बाळ घेऊन भीक मागणाऱ्यांची संख्याही बरीच आहे. हे सारे लोक स्टेशनात तरी कसे येतात, लोकलमध्ये कसे चढू शकतात? यांना रोखणारी, हटवणारी, व कारवाई करणारी यंत्रणा कुठे दिसत नाही. लोकलधील खचाखच गर्दीमध्ये पाकीटमार व मोबाईल चोरांच्याही टोळ्या सावज शोधत असतात. पण कुठे रेल्वे पोलिसांचा त्यांना धाक आहे असे कुठे दिसत नाही. मुंब्रा येथे गर्दीत तोल न सावरता आल्यामुळे डझनभर प्रवासी खाली पडले, ही गर्दी नियंत्रित होणार नसेल तर पुढेही असे अपघात होत राहतील. मुंबईची जीवनवाहिनी सुरक्षित राहिली पाहिजे याची जबाबदारी रेल्वे प्रशासन व रेल्वे पोलिसांची आहे.

# कोकणातील विजेचा लपंडाव थांबणार कधी?

आपल्या देशातील विकसनशील राज्यांपैकी एक म्हणजे महाराष्ट्र राज्य. त्याच राज्यातील कोकण विभागाचा विचार करता कोकण विभागात आजही विजेचा लपंडाव होत आहे. कोकण विभागात महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड म्हणजे महावितरण कंपनी वीज पुरवठा करीत असते. असे असले तरी कोकणातील विजेचा लपंडाव आजही का होतो याची कारणे शोधून त्यावर तातडीने उपाय योजना करणे गरजेचे आहे.



कोकण विभागात महावितरण कंपनी वीज पुरवठा करीत असली तरी आजही विजेच्या लपंडावामुळे नागरिकांना बऱ्याचवेळा त्रास सहन करावा लागतो. तसेच वीज ग्राहकांकडून जर बिल उशिरा भरल्यास त्याला दंड आकारला जातो. मात्र दंड भरून सुद्धा विजेचा लपंडाव संपलेला नाही. हे अनेक वर्षे चालत आले आहे. तेव्हा महावितरण कंपनीचे जे अधिकारी आहेत त्यांनी वीज पुरवठ्याची समस्या समजून घेऊन ती तत्काळ सोडविणे आवश्यक आहे. त्यासाठी ज्या समस्या आहेत त्याचा त्या त्या विभागामध्ये सर्व्हे करून ज्या समस्या निर्माण होत आहेत त्यावर उपाय सुचवून ताबडतोब दीर्घकालीन उपाय योजना करायला हव्यात. म्हणजे विजेचा जो लपंडाव आहे तो कमी होऊन नागरिकांना वीज समस्येला तोंड देण्याची वेळ येणार नाही.

याचा चांगला परिणाम महावितरणातील वीजपुरवठा सुरळीत चालण्यास मदत होईल. तेव्हा महावितरण कंपनीने नागरिकांना वीज पुरवठ्याची समस्या सोडवण्यात कोणत्या प्रकारे अपयशी येत आहे त्याचा अभ्यास करणे गरजेचे आहे, तरच कोकणातील विजेचा लपंडाव थांबण्यास मदत होईल. कोकण विभागातील ग्रामीण भागात आजही अधूनमधून वीज पुरवठा खंडित होत असल्यामुळे नागरिक त्रस्त असताना दिसून येतात. वीज खंडित झाल्याने आपल्या अंगातील घामाच्या धारा वाहू लागतात. उन्हाळ्याचा विचार करता कडक उन्हामुळे आपल्या अंगाची लाहीलाही झाल्याचे उन्हाळ्यात आपणा सर्वांना अनुभव आला असेल. आता पावसाला सुरू झाला तरी विजेचा लपंडाव थांबलेला नाही. ही कोकणातील सर्वात मोठी समस्या आहे. वीज पुरवठा खंडित झाल्याने अनेक वेळा नागरिकांना नुकसान सहन करावे लागते. अशा वेळी कोकणातील ग्रामीण भागात वारंवार वीज खंडित होत असल्यामुळे विजेचा लपंडाव थांबणार कधी असा प्रश्न नागरिक महावितरण कंपनीला विचारत आहेत. तसेच वीज पुरवठा नियमित होत नसेल, तर त्या विजेचा उपयोग काय? असे असताना सुद्धा नियमित वीज बिले भरावी लागतात. काही वेळा वीज पुरवठा बंद असून सुद्धा विजेच्या बिलात कपात केली जात नाही. काही ठिकाणी मीटर बंद असताना सुद्धा जास्त भाडे आकारले जाते. म्हणजे एकप्रकारे महावितरण कंपनी नागरिकांच्या जीवाचा खेळ खेळत आहे, असेच म्हणावे लागेल.

कोकणामध्ये विजेचा लपंडाव ही आजची समस्या नाही, तर कोकणात वीज पुरवठा सुरू झाल्यापासून कोकणी जनता विजेच्या लपंडावाने त्रासली आहे. अनेक वेळा महावितरण कार्यालयावर मोर्चे काढण्यात आले. अनेक राजकीय नेत्यांनी विजेचा पुरवठा नियमित करण्यात यावा अशा आशयाची पत्रे दिली तरी वीज पुरवठा सुरळीतपणे चालत नाही. फक्त आश्वासने दिली जातात. ही आजची परिस्थिती आहे. असे किती वर्षे चालणार आहे. तेव्हा महावितरणाच्या समस्या जाणून घेऊन त्यावर कायमस्वरूपी उपाय सुचविण्यात आले पाहिजेत. यासाठी वीज पुरवठा खंडित का होतो? काम योग्य प्रकारे झाले आहे का? योग्य पात्रताधारक स्टाफ आहे का? कार्यालये नियमित चालू असतात का? वीज ग्राहकांच्या आलेल्या तक्रारी वेळच्या वेळी सोडवल्या जातात का? कायमस्वरूपी व प्रशिक्षित स्टाफ आहे का? कार्यालयात आवश्यक सुविधा सेवकांना आहे का? विजेला आवश्यक साधनसामग्री उपलब्ध आहे का? स्टाफचे भवितव्य काय? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे महावितरण कंपनीला शोधावी लागतील. मात्र तसे होताना दिसत नाही. जर झाले असते, तर आज विजेचा लपंडाव झाला नसता.

आजच्या धावपळीच्या जीवनात वीज महत्त्वाची झाली आहे. असे असताना सुद्धा आजही ग्रामीण भागात विजेचा लपंडाव दिसून येतो. त्यात रात्रीचे अधिक प्रमाण दिसून येते. तेव्हा वीज पुरवठा करणाऱ्या महावितरण कंपनीने सतर्क राहणे गरजेचे आहे. सध्या वीज नागरिकांची मूलभूत गरज झाली आहे. प्रत्येक गोष्ट विजेवर चालत आहे तेव्हा वीज पुरवठा खंडित झाल्यास जनतेला त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो.

ग्रामीण भागात दर सोमवारी सकाळी दहा ते दुपारी दोन या वेळात वीज पुरवठा खंडित केला जातो. मी मे महिन्यामध्ये काही दिवस गावी होतो. सोमवार सोडा संध्याकाळी दहा मिनिटे लाईट चालू, तर वीस मिनिटे लाईट बंद असा उपक्रम रात्री दहापर्यंत चालत असे. त्यानंतर रात्री दोनच्या सुमारास व पहाटेच्या चार साडेचारच्या सुमारास लाईट खंडित होत होती. काही ठिकाणी तीस तास लाईट नाही, २४ तास लाईट गायब, महिनाभर लाईटचा खेळखंडोबा अशा बातम्या वर्तमानपत्रात वाचायला मिळाल्या. तेव्हा ग्रामीण असो वा शहरी विभाग विजेचा पुरवठा खंडित होता कामा नये.

वीजेचा पुरवठा खंडित झाल्यास त्याचा परिणाम व्यवसायावर होतो. इतकेच नव्हे, तर आपल्या विभागातील विविध दुकाने, विविध व्यावसायिक, सरकारी कार्यालये, बँका आणि दवाखाने यांना २४ तास लाईटची गरज असते ही महत्त्वाची बाब आहे. त्याप्रमाणे वेळीच बदल करून आपली सेवा सुरळीतपणे महावितरण कंपनीने सुरू ठेवावी. त्यासाठी योग्य ती काळजी कंपनीने घेणे गरजेचे आहे. यात देखभाल महत्त्वाची असते. असे जर झाले, तर कोकणातील विजेचा लपंडाव होणार नाही.

# स्वामी विवेकानंद विद्या मंदिर शाळेमध्ये गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ संपन्न

## ८ वी शिष्यवृत्तीधारक, होमी भाभा बाल वैज्ञानिक व एम.टी.एस. ऑलंपियाड राज्य स्तरीय परीक्षेतील मोमेंटो, गोल्ड मेडल व सिल्वर मेडल प्राप्त एकूण ७५ विद्यार्थ्यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला

**केज । प्रतिनिधी**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२४ –२५ वर्षातील विविध स्पर्धा परीक्षेमध्ये नेत्रदीपक यश संपादन केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जीवन विकास शिक्षणमंडळाचे सचिव जी.बी.गदळे, प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा शैलाताई इंगळे,तर प्रमुख उपस्थिती म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळाचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, ज्येष्ठ शिक्षक अजय देशपांडे तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेतील सहशिक्षक तसेच एम.टी.एस. ऑलंपियाड समन्वयक बी.एम.टिंगरे यांनी केले याप्रसंगी ते म्हणाले की, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग या शाळेचा आलेख केवळ गुणात्मक नव्हे तर संख्यात्मक ही वाढत आहे.यावर्षी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एकूण पाच विद्यार्थी शिष्यवृत्ती धारक झाले आहेत.डॉ. होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षेमध्ये एकूण तीन विद्यार्थी दुसऱ्या लेव्हल साठी पात्र ठरले आहेत. महाराष्ट्र टॅलेंट सर्च राज्यस्तरीय परीक्षेमध्ये शाळेतील मुंडे आर्यन अंगद इयत्ता सातवी मधून राज्यातून सर्व प्रथम आला आहे.तर एम.टी.एस.ऑलंपियाड परीक्षेमध्ये इयत्ता आठवीतून यादव हिंदवी विष्णू राज्यातून सर्वतृतीय आली आहे. स्पेशल मोमेंटो प्राप्त ३ विद्यार्थी,गोल्ड मेडल प्राप्त २१ विद्यार्थी, सिल्वर मेडल प्राप्त ३६ विद्यार्थ्यांचा समावेश आहे.




याप्रसंगी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष जी. बी.गदळे म्हणाले की, विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षेतूनही आपले करिअर घडवले पाहिजे.त्या दृष्टिकोना तून यशस्वी वाटचाल केली पाहिजे.यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांच्या यशामध्ये विद्यार्थ्यांचा पाया घडविणाऱ्या शिक्षकांचे योगदान फार महत्त्वाचे असते.शेवटी त्यांनी सर्व स्पर्धा परीक्षे तील गुणवंतविद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचेही अभिनंदन केले. आठवी शिष्यवृत्तीधारक विद्यार्थी– यादव हिंदवी विष्णू,मोरलवार कैवल्य गणेश,जगदाळे श्रेयस किरण,चव्हाण अक्षरा सुंदर,यादव पार्थ विष्णू इत्यादी. डॉ.होमी भाभा बाल वैज्ञानिक परीक्षा–भिसे अभिनव श्रीहरी, सांजुरे आकांक्षा दिपक, लटपटे आर्या राजेंद्र इत्यादी. महाराष्ट्र टॅलेंट सर्च परीक्षा– मुंडे आर्यन अंगद राज्यातून सर्वप्रथम,चाटे ओंकार सूर्यकांत केंद्रातून सर्वद्वितीय इत्यादी. एम.टी.एस.ऑलंपियाड राज्यस्तरीय परीक्षा– यादव हिंदवी विष्णू राज्यातून सर्वतृतीय, मोरलवार कैवल्य गणेश जिल्ह्यातून सर्व द्वितीय, लटपटे आर्या राजेंद्र जिल्ह्यातून सहावी हे विद्यार्थी स्पेशल मोमेंटो साठी पात्र ठरले आहेत.एम.टी.एस. ऑलंपियाड गोल्ड मेडल प्राप्त विद्यार्थी– काकडे अनुष्का बाबासाहेब, चौरे सोहम लक्ष्मण, डोईफोडे आदित्य राजाभाऊ,कांबळे जयराज हरिभाऊ,मोरे संस्कृती दत्ता,खरमाटे सत्यानंद मेघराज,काळे शौर्य सागर,चाटे रोहन संतोष,घोळवे गुंजन धनंजय,कापरे अथर्व अंकुश,जाधव संस्कृती भारत,शेळके हर्षदा संजय,घोडके शिवम संतोष,ठोंबरे श्रेयश श्रीधर,बावगे वेदांत महादेव,देशमुख गौरी गणेश,शेटे सक्षम मिलिंद,ढोबळे प्राची युवराज,क्षीरसागर सिद्धी सचिन इत्यादी.एम.टी.एस.ऑलंपियाड सिल्वर मेडल प्राप्त विद्यार्थी– रणवीर रविंद्र मुंडे,अनुष्का आश्रुबा नागरगोजे,प्रणव स्वप्नील वाघमारे,अपूर्वा उत्तरेश्वर सोनवणे, आरती बिबिशन चाटे, सौम्या सचिदानंद ढेपे, संस्कृती रणजितकेदार, अमृता नरसिंग शिंदे, अंजली लक्ष्मण चौरे, आर्या अशोक खोगरे, तनुजा संतोषकुमार बियाणी,श्रेया प्रविण मैंद्रे,अथर्व बाबू इंगोले, रुपाली शिवराज लांब, शिवभक्ती प्रेमानंद स्वामी,रसिका शाहूराव कुलकर्णी,शिवानी शिवराज जाधव,आरती वैजनाथ राऊत,अंकिता संतोष चौरे,आर्या बालाजी शेटे,समर्थ प्रशांत चौरे,विक्रांत महादेव चौगुले,आरव दिपक कांबळे,तनुजा शिवराम राऊत,श्रेया पांडुरंग घाटुळे,दुर्गेश सचिन जोगदंड,श्रेया विनोद गुंड,श्रावणी सचिन मुळे,प्रतिक रामेश्वर डोईफोडे,पवन जयदेव चौरे,अक्षरा विकास नेहरकर,आर्या रमेश डोईफोडे,राजेश अशोक साखरे,प्रथमेश चंद्रकांत पाळवदे,वैभव अंगद ससाणे,सोनाक्षी किशोर दुनघव,भिसे श्रेया श्रीहरी,काकडे अथर्व विजय,कदम कार्तिक सुरेशकार्यक्रमाचे सूत्रसंचलन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी केले.तर आभार कल्याण आदमाने यांनी मानले.

# साबला नगरीत तननाशक औषध फवारणी



**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील साबला या नगरीत ग्रामपंचायत कार्यालयाच्या वतीने तननाशक औषधांची फवारणी करण्यात आली . सरपंच जनाबाई नरहरी काकडे , उपसरपंच कचराबाई राजेंद्र सरवदे , ग्रामपंचायत अधिकारी शिंपले तानाजी आश्रुबा यांच्या मार्गदर्शनाखाली .

साबला या नगरीत नेहमीच स्वच्छता मोहीम राबविण्यात येत असून . याचे कारण म्हणजे गावात रोगराई पसरु नये तसेच , गावातील वातावरण स्वच्छ रहाव . स्वच्छ गाव , सुंदर गाव . तसेच झाडे लावा , झाडे जगवा , पाणी अडवा , पाणी जिरवा . या नुसार साबला नगरीतील कामकाज चालत आहे .साबला नगरीत तननाशक औषधांची फवारणी समाजसेवक नरहरी काकडे , ग्रामपंचायत सदस्य माऊली पांचाळ , ग्रामपंचायत कर्मचारी गुलाब मुळे , विश्वनाथ नाईकनवरे , तसेच बाबासाहेब काकडे , रामराजे काकडे , विकास सरवदे , लक्ष्मण कटारे या वेळी इत्यादींची उपस्थिती होती .

# चंद्रपूरात मुख्यमंत्री यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या पासून देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकाराने राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या २० जुलैपासून देवाभाऊ जनकल्याण सेवा सप्ताह साजरा करण्यात येत आहे. उद्या १० रक्तदान शिबिरे, ३ ठिकाणी धार्मिक स्थळी महाआरती, ७ ठिकाणी योग शिबिरे आणि ७ ठिकाणी वृक्षारोपण कार्यक्रमाच्या आयोजनातून या सेवा सप्ताहाला सुरवात होणार आहे. पुढील १० दिवसात चंद्रपूर मतदारसंघात तब्बल ३३४ वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून या सेवासप्ताहाला एक व्यापक आणि लोकाभिमुख स्वरूप देण्यात आले आहे.

या सप्ताहादरम्यान आरोग्य, शिक्षण, महिला सक्षमीकरण, सामाजिक समरसता, अध्यात्म व संस्कृती अशा विविध क्षेत्रातील उपक्रम राबवले जात असून, शहर आणि ग्रामीण परिसरातील जनसामान्यांपर्यंत थेट पोहोचणारे उपक्रम या निमित्ताने पार पडत आहेत.



सप्ताहात शहरातील अनेक ठिकाणी वृक्षारोपण मोहीम, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप, अल्पसंख्याक समाजासाठी उपक्रम, तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या जीवनप्रवासावर आधारित चित्रप्रदर्शन व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या सर्व उपक्रमांमधून सामाजिक भान निर्माण करण्याबरोबरच नागरिकांना थेट लाभ मिळावा, हा मुख्य उद्देश असल्याचे आमदार जोरगेवार यांनी स्पष्ट केले.सदर सेवासप्ताहात २८ जुलै रोजी महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या भिवापूर वार्डातील प्राचीन शिवलिंगाजवळ महारुद्राभिषेक आणि जलाभिषेक सोहळा संपन्न होणार आहे. या सोहळ्यात राज्यभरातील ५५ पवित्र नद्यांचे जल अर्पण करून धार्मिकतेसोबत पर्यावरण जागृतीचा संदेश देण्यात येणार आहे.२७ जुलै रोजी शकुंतला लॉन येथे आयोजित भव्य आरोग्य शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत विविध तपासण्या, रक्त व नेत्र तपासणी तसेच मोफत औषध वितरण करण्यात येणार आहे. तर २९ जुलै रोजी त्याच लॉनमध्ये २,०५५ शाळकरी विद्यार्थिनींना सायकल वाटप करण्यात येणार असून, शिक्षणात सातत्य राखण्यासाठी हा उपक्रम अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

या सेवासप्ताहात विविध संस्था, स्वयंसेवी कार्यकर्ते व स्थानिक नागरिकांचा सक्रिय सहभाग दिसून येत असून, संपूर्ण चंद्रपूर जिल्ह्यात या उपक्रमांमुळे एक सकारात्मक सामाजिक चळवळ निर्माण होत आहे. लोककल्याणाच्या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या या सप्ताहामुळे आरोग्यविषयक जागरूकता, शैक्षणिक प्रोत्साहन आणि सामाजिक ऐक्य वृद्धिंगत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

# प्रवीणदादा गायकवाड यांच्यावरील जीवघेण्या हल्ल्याचा निषेधार्थ एक दिवसीय धरणे आंदोलन

**वाघाळा । प्रतिनिधी**

अक्कलकोट, जिल्हा सोलापुर येथे काही समाजकंटकांनी केलेल्या भ्याड व जीवघेणा हल्याचा निषेध करण्यासाठी नांदेड जिल्हातील सर्व मराठा संघटना एकत्र येऊन सकल मराठा समाजाच्या व समविचारी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.




महाराष्ट्रातील गावोगावी जाऊन फुले शाहू आंबेडकरांचे विचार युवकांमध्ये पेरणारे, बहुजन समाजातील शेकडो युवकांना उद्योजक बनविणारे प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोटमध्ये भ्याड हल्ला झाला. रविवारी दुपारी साडे तीन वाजण्याच्या सुमारास काही तरुणांनी गायकवाड यांच्यावर शाईफेक करून त्यांच्याशी असभ्य वर्तन केले. सामाजिक वर्तुळातून घडलेल्या घटनेचा निषेध व्यक्त होत असताना पुरोगामी चळवळीतील नेते, युवकांच्या मन आणि मेंदूच्या मशागतीसाठी राज्यभर फिरून व्याख्याने देणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांना शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी काळे फासले. अक्कलकोटमध्ये सत्काराच्या कार्यक्रमाला गेलेले असताना त्यांच्यावर शिवधर्म फाऊंडेशनच्या कार्यकर्त्यांनी हल्ला चढवला. गायकवाड यांची गाडी देखील फोडण्यात आली तसेच त्यांच्या अंगावरील कपडे फाडण्याचा प्रयत्न शिवभक्त म्हणवल्या जाणाऱ्या कार्यकर्त्यांनी केला. बहुजन समाजात अनेक उद्योगपती घडवणारे संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे शाईफेक करणाऱ्या विकृतीचा जाहीर निषेध. शिव–फुले–शाहू–आंबेडकर यांचा विचार समाजात रुजवण्याचं खूप मोठं कार्य प्रविणदादा गायकवाड यांच्या हातून होत आहे. अभ्यासाच्या बळावर त्यांनी अनेकांना उघडं पाडण्याचं काम केलं. म्हणून तर समाजकंटकांनी त्यांच्याशी अशा प्रकारे गैरकृत्य केलं नाही ना? याचाही तपास झाला पाहिजे. तसंच हे कृत्य करणारी व्यक्ती कोणत्या पक्षाशी आणि विचारांशी संबंधित आहे हे उघड आहे. त्यामुळे या भ्याड कृत्यामागील मास्टरमाईंडचाही पोलिसांनी शोध घ्यावा. आम्ही सर्वजण प्रविणदादा गायकवाड यांच्या पाठीशी खंबीरपणे उभं आहोत, असे सकल मराठा समाजाच्या व समविचारी संघटनेच्या वतीने नांदेड च्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले.यावेळी सकल मराठा समाजाचे व समविचारी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाच्या केज तालुकाध्यक्षपदी अमर भैय्या पाटील यांची निवड

**केज । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) यांच्या वतीने केज तालुक्यातील राजकारणात सक्रीय व लोकसंग्रही नेतृत्व म्हणून ओळख असलेले श्री. अमर अशोकराव पाटील यांची तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.



पक्षाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खा. सुनिलजी तटकरे व आ. धनंजय मुंडे यांच्या मान्यतेने ही नियुक्ती जाहीर झाली असून, पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष ॲड. राजेश्वर चव्हाण यांनी त्यांचे अभिनंदन करत नियुक्तीपत्र दिले.राजमुद्रा ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष म्हणून ओळख असलेले अमर भैय्या पाटील हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रात सक्रीय आहेत. अठरापगड जातीतील युवकांना सोबत घेऊन त्यांनी अनेक उपक्रम राबवले असून, गरीब–शोषित वर्गासाठी सतत कार्यरत राहिले आहेत.ना. अजितदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीची विचारधारा केज तालुक्यातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचविण्याचे काम ते प्रामाणिकपणे करतील, असा विश्वास जिल्हा व राज्य पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.या निवडीमुळे केज तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार गट) कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले असून, सर्वत्र अमर भैय्या पाटील यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

# वारकऱ्यांचा वारी दरम्यान नैसर्गिक मृत्यू झाल्यास किंवा आजारी पडल्यास मदतीसाठी शासन निर्णयात तातडीने सुधारणा करा–आमदार राहुल कुल

**दौंड । प्रतिनिधी**

आषाढीवारी २०२५ दरम्यान लाखो वारकरी श्री विठोबा–रूखमाई चरणी नतमस्तक होण्यासाठी पंढरपूरच्या दिशेने पायी चालत जातात. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने ‘विठ्ठल–रूखमाई वारकरी योजना २०२५’ लागू करून अपघाती मृत्यू, अपंगत्व व इस्पितळ खर्चासाठी आर्थिक मदतीची तरतूद केली आहे. परंतु वारी दरम्यान हृदयविकाराचा झटका,रक्तदाब वाढणे,साथीचे आजार,अथवा थकव्यामुळे नैसर्गिक मृत्यू होणाऱ्या वारकऱ्यांना सदर योजनेत सध्या मदत मिळत नाही. यामध्ये सुधारणा करून नैसर्गिक मृत्यू व आजारांना देखील समाविष्ट करण्याची मागणी आमदार राहुल कुल यांनी शासनाकडे केली आहे. वारीदरम्यान काही वारकऱ्यांचा अचानक रक्तदाब वाढल्याने, हृदयविकाराच्या झटक्याने तसेच चालून आलेल्या थकव्यामुळे मृत्यू झाला आहे.काहींना साथीचे ताप, फुफ्फुसाचे विकार,आणि पायाला चिखलामुळे झालेला सेप्टिक यामुळे अनेक दिवस इस्पितळात दाखल करावे लागले आहे.परंतु सद्य:स्थितीत केवळ अपघात व नैसर्गिक आपत्तींमध्ये मृत्यू झाल्यासच आर्थिक मदत मिळते. त्यामुळे या योजनेंतर्गत नैसर्गिक मृत्यू झालेल्या वारकऱ्यांच्या कुटुंबीयांनाही रु. ४ लाखांची आर्थिक मदत मिळावी,अशी मागणी आमदार राहुल कुल यांनी शासनाकडे केली आहे.तसेच,सध्या हॉस्पिटलमध्ये दाखल झाल्यास मिळणारी मदत अपुरी असून,उपचाराचा खर्च लक्षणीयरीत्या वाढलेला आहे. म्हणून ही रक्कम वाढवावी,किंवा सर्व वारकऱ्यांना मुख्यमंत्री सहायता निधी तसेच महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करून द्यावी,अशीही विनंती त्यांनी केली आहे.शासनाने दिनांक १ जुलै २०२५ रोजी यासंदर्भात निर्णय घेतला असून,ही योजना ३० जुलै २०२५ पर्यंत लागू आहे.या कालावधीतच सुधारित शासन निर्णय जारी करून,वारी दरम्यान चालत असताना हृदयविकाराने वा अन्य नैसर्गिक कारणांनी मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांचाही समावेश या योजनेत करावा,असा आग्रह आमदार राहुल कुल यांनी शासनाकडे धरला आहे. वारकरी बांधव हे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे खरे वाहक असून,त्यांना सुरक्षितता आणि आरोग्यसेवेच्या माध्यमातून सन्मान देणे हे शासनाचे कर्तव्य आहे,असेही आमदार राहुल कुल यांनी म्हटले आहे.

# सकारात्मक,विश्लेषणात्मक पत्रकारितेवर माध्यमांनी अधिक भर द्यावा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## बीड जिल्हा माहिती कार्यालयाकडून पत्रकारांसाठी कार्यशाळा

### कार्यशाळेस पत्रकारांची बहुसंख्येने उपस्थिती; जिल्हाधिकारी यांच्या हस्ते कार्यशाळेचे उदघाटन

**बीड । प्रतिनिधी**

समृद्ध लोकशाहीसाठी प्रसार माध्यमे, प्रशासन आणि नागरिक यांच्यात समन्वय आवश्यक आहे. नागरिक व प्रशासनात समन्वय साधण्यासाठी माध्यमे मोलाची जबाबदारी पार पाडत असतात. तरीही माध्यमांनी सकारात्मक, विश्लेषणात्मक पत्रकारितेवर अधिक भर द्यावा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आज येथे केले.शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन सभागृह येथे माहिती जनसंपर्क महासंचालनालयाच्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने पत्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उदघाटन जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्याहस्ते झाले, यावेळी ते बोलत होते. प्रमुख मार्गदर्शक दीपक रंगारी, माध्यम तज्ज्ञ डॉ. प्रभू गोरे, प्रा. शिवशंकर पटवारी, प्र. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके यांची उपस्थिती होती.प्रथम मान्यवरांच्या हस्ते आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्वलन करण्यात आले.जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले, शासन, जिल्हा प्रशासन नागरिकांच्या समस्या, प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्नशील आहे. आता जिल्हा स्तरावर होत असलेल्या जनता दरबार प्रमाणे तालुका स्तरावर देखील अधिकारी जनता दरबार घेत आहेत. जनतेचे प्रश्न, समस्या सोडवत आहेत. जनमत घडवण्याचे काम माध्यमे प्रभावीपणे करतात. त्यामुळे आजच्या नवमाध्यमाच्या युगात आणि समाज माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेता सत्य माहिती जनतेला देण्याची जबाबदारी माध्यमांना पार पाडावी लागणार आहे. तसेच नागरिकांना त्यांच्या कर्तव्याप्रती जागरूक करण्याची जबाबदारीही माध्यमांनी पार पाडणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले. आजच्या या कार्यशाळेतून पत्रकारांसाठी असलेल्या शासनाच्या योजना, सवलत, सोयी सुविधा यांची माहिती होण्यास उपयोग होईल, त्याचाही पत्रकारांनी लाभ घ्यावा, असेही जिल्हाधिकारी जॉन्सन म्हणाले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. श्याम टरके यांनी केले. आभारही त्यांनीच मानले. कार्यशाळेबाबत प्रातिनिधिक स्वरूपात




संपादक बाळासाहेब फपाळ यांनी मनोगत व्यक्त केले. माहिती आणि महासंचालनालयाच्या जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित पत्रकारांसाठी कार्यशाळेत तज्ज्ञांनी पत्रकारांना कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारित, प्रमाणभाषा लेखन, समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये याबाबत मार्गदर्शन केले. प्रा. रंगारी यांनी 'वृत्त संकलन आणि संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व' याविषयी मार्गदर्शन केले. मराठी प्रमाणभाषेच्या शुद्धलेखनाचे नियम, शब्दांचा अर्थ, भाषेतील व्याकरणाचा वापर याबरोबरच मराठी भाषा समृद्ध करण्यात विविध साहित्यिकांनी दिलेल्या योगदानाविषयी माहिती दिली.वाक्यामध्ये येणारी क्रियापदे, शब्दयोगी अव्यय, ऱ्हस्व, दीर्घ, ईकारांत याबरोबरच एकाक्षरी क्रियापद, शब्दयोगी अव्यय, तत्सम आणि तद्भव शब्दांविषयीचे स्पष्टीकरण उदाहरणासह समजावून सांगितले. पत्रकाराने शब्दकोश आणि लेखनकोश याचा वापर करून निर्दोष लिखाण याविषयी मार्गदर्शन केले. विविध शब्दांच्या वाक्यानुसार आणि वेळेनुसार होणारा बदलही त्यांनी उदाहरणासह स्पष्ट केले.अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी या विषयांवर प्र.जिल्हा माहिती अधिकारी डॉ.टरके यांनी माहिती दिली.

समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये या विषयांवर डॉ. गोरे यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. संक्षिप्तता, थेट आशय, छोटी वाक्ये, शब्दांचे महत्त्व, योग्य मथळा, सातत्याने समाज माध्यमावर लिहा, योग्य हॅशटॅग, थंबनेल, ग्राफिक्स, भाषा आणि टोन आदी बाबींवर मार्गदर्शन केले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता याविषयावर प्रा. पटवारी यांनी मार्गदर्शन केले. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता पूर्वीची पत्रकारिता, भाषा, कला, शास्त्र, संस्कृती, राष्ट्रीय -प्रादेशिक वृत्तपत्रे यांची स्थिती आणि सद्यस्थितीत वापरात येत असलेली सॉफ्टवेअर, ऍप्स आदीबाबतीत सविस्तर माहिती दिली. या कार्यशाळेसाठी पत्रकारांच्या संघटनांचे अध्यक्ष, पदाधिकारी, शहरासह, जिल्ह्यातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रामाणिकपणा,शिस्त आणि सातत्य हेच यशाचे गमक-उपजिल्हाधिकारी लाटकर

### कॉ.बाबूसाहेब देशमुख स्मृती व्याख्यानमाला व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा संपन्न

**परळी । प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांनी मोबाइल पेक्षा पुस्तकी ज्ञान घेण्यावर भर देत केवळ नौकरी मिळण्यासाठी नव्हे तर मूल्ये शिकण्यासाठी ज्ञान प्राप्त करावे असे प्रतिपादन परळी विभागाचे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी केले. शनिवार दि १९ रोजी तालुक्यातील मोहा येथील महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे संस्थापक संचालक कॉ.बाबूसाहेबअण्णा देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित स्मृति व्याख्यानमाला व गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा प्रसंगी ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी अध्यक्षस्थानी संस्थेचे जेष्ट संचालक कॉ.सुदामदादा देशमुख, संस्थेचे सचिव कॉ.एड.अजय बुरांडे, संचालक कॉ.प्रा.धुळे सर, कॉ.सुदाम शिंदे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, कॉ.सखाराम शिंदे, प्रमुख पाहुणे म्हणून





प्रा.दयानंद झिंझुर्ड, माजी नायब तहसीलदार बाबुराव रूपुनर, कॉ.गंगाधर पोटभरे, संभाजी देशमुख, शाळेचे मुरलीधर बोराडे आदी मंचावर उपस्थित होते.पुढे बोलताना श्री लाटकर यांनी सांगितले की, दरवर्षी लोकसेवा आयोगाच्या परीक्षा लाखो विद्यार्थी देतात मात्र ज्यांच्यात प्रामाणिकपणा, जिद्द, चिकाटी, शिस्त आणि सातत्य आहे असेच विद्यार्थी शेवट पर्यंत टिकून यश संपादन करत असतात.ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शालेय जीवनात विविध स्पर्धा परिक्षेत सहभागी झाल्याने आयोगाच्या परीक्षेत यश मिळण्यास मदत होते.शिक्षजासोबतच मानवी मूल्ये देखील अंगीकारून आपल्या परिवाराशी, समाजाशी असलेली नाळ कायम टिकून ठेवावी.ग्रामीण भागात असलेल्या महाराष्ट्र शिक्षण संस्थेप्रमाणेच मी देखील माझ्या शाळेमुळेच घडलो असून या संस्थेचे, शाळेचे कार्य स्तुत्य आणि अभिनंदनीय आहे असे त्यांनी सांगितले. तर आपल्या अध्यक्षीय समारोपात संस्थेचे सचिव कॉ.एड.अजय बुरांडे यांनी संस्था मागील ६ दशकापासून संस्थापकांच्या आदर्श डोळ्यासमोर ठेऊन ध्येयावर काम करत असून शिक्षणासोबतच संघटन आणि संघर्ष याची प्रेरणा देण्याचे काम करत आहे असे सांगितले.

या प्रसंगी उपस्थित असलेले डॉ.प्रा.दयानंद झिंझुर्डे यांनी काव्यमय रचनेतून विद्यार्थ्यांना यथोचित मार्गदर्शन करत वास्तविक परिस्थितीचे भान करून देत शिक्षणाचे महत्व विशद केले. या व्याख्यानमाले प्रसंगी शाळेतील एच. एस.सी, एस.एस.सी, शिष्यवृत्ती, नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, एन.एम.एम.एस, एमटीएस अशा विविध बोर्ड व स्पर्धा परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व सन्मान करण्यात आला.या व्याख्यानमालेचे प्रास्ताविक मुरलीधर बोराडे, ऋणव्यक्त केशव दीक्षित तर सूत्र संचलन अंगद पेड्डेवाड यांनी केले.

# मोराला वाचवताना युवकाचे प्रयत्न ठरले निष्फळ: विषबाधेने मोराचा मृत्यू झाल्याचा अंदाज

**केज । गौतम बचुटे**

शेतात अत्यवस्थ पडलेल्या मोराला वाचविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या तीन युवकांचे प्रयत्न निष्फळ ठरले असून मोराचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे.या बाबतची माहिती अशी की, दि. २० जुलै रोजी केज तालुक्यातील डोणगाव येथे सायंकाळी ६:०० वा. च्या सुमारास उत्तरेश्वर घुले यांना त्यांच्या शेतात अत्यवस्थ असलेला मोर आढळून आला. त्यांनी त्याचे मित्र हनुमंत घुले आणि अशोक केदार यांच्या मदतीने त्यांनी मोराला वाचविण्यासाठी केज येथे घेऊन आले. त्यांनी केज पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश क्षीरसागर, पोलिस नाईक शिवाजी कागदे यांनी पशूवैद्यकीय अधिकारी डॉ. मस्के आणि धारूर वनविभागाचे वनसेवक वाचिष्ठ भालेराव, शाम गायसमुद्रे व जीवनसिंग गोके यांच्याशी संपर्क साधला. मात्र उपचार सुरू करण्या पूर्वीच मोराचा मृत्यू झाल्याची माहिती पशु वैद्यकीय अधिकारी डॉ. मस्के आणि



वनसेवक वचिष्ठ भालेराव यांनी दिली.

मोराचा मृत्यू हा विषबाधेने झाला असल्याचा प्राथमिक अंदाज असून वनविभागाचे विभागीय वनअधिकारी गुणावत, वनरक्षक पाईक यांच्या आदेशाने वनसेवक वचिष्ट भालेराव, चालक शाम गायसमुद्रे, जीवनसिंग गोके या कर्मचाऱ्यांनी मृत्यू झालेल्या मोराचा शरीर ताब्यात घेत ते उत्तरीय तपासणीसाठी घेऊन गेले असून त्याची उत्तरीय तपासणी व शवविच्छेदन केल्या नंतर नियमा नुसार अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

# प्रशांत नगर कानडी रोड येथील मुख्य रस्ताच टाकला खोदून!



**केज । प्रतिनिधी**

केज शहरातील प्रशांत नगर कानडी रोडचा वार्ड क्रमांक ४ चा मुख्य रहदारीचा रस्ताचखोदून टाकल्यामुळे या भागातील नागरिकांना रहदारी साठी तसेच वाहन ये-जा करण्या साठी रस्ताच खोदून टाकल्यामुळे गैरसोय होत आहे.गेली पन्नास वर्षे झाले हा रस्ता आहे यावर नगरपंचायत अंतर्गत रस्ते व नाली बांधकाम बऱ्याच वेळा झाले असून याचेरीतसर बिल सुद्धा गुत्तेदारांनी उचललेले आहे.हा प्रशांत नगरचा मुख्य रस्ता आहे व तो जवळ पास पन्नास वर्षे झाले येथील नागरिकांच्या वापरात आहे.१५ फुट रस्ताच खोदून टाकल्या मुळे या भागातील नागरिकांचे रहदारी साठी तसेच वाहन चालवताना अतोनात हाल होत आहेत.मोठी चार चाकी गाडी तर आतबाहेर जाणे शक्यच राहिलेनाही.वकिलवाडी अंतर्गत येणाऱ्या या भागात रमेश आडसकर यांचे निवासस्थानअसून त्यांना मानणारा वर्ग या भागात मोठ्या प्रमाणात असून त्यांच्या शब्दावर या भागातील रहिवासी प्रत्येक वेळेस नगरसेवक निवडून देत आहेत.परंतु निवडून आलेल्या नगरसेवकांचे या भागाकडे कायम साफ दुर्लक्ष असते. एकदा का नगरसेवक निवडून आले की पुन्हा ते या भागात ढुंकूनही पाहत नाहीत असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.प्रशांत नगरचा मुख्य रस्त्याच खोदून टाकल्यामुळे या भागातील नागरिकांनी पोलिस निरीक्षक, पोलिस स्टेशन केज येथे निवेदन दिले आहे. प्रशांत नगर भागात बहुतांश हिंदू नागरिक असून सदर रस्ता खोदणारा ईतर समाजा तील व्यक्ती असल्याने सामाजिक तेढ निर्माण होऊ शकते.विशेष म्हणजे त्याने खरेदी केलेली कागदपत्रे तपासून घेतले पाहिजेत ही कागदपत्रे इनामी जागेची असून यात खरेदी-विक्री बाँडवर झालेले आहे विषेश म्हणजे ज्याच्याकडून विकत घेतली आहे त्याच्या नावावरफेरफार नोंद सूद्दा झालेली नसताना त्यानेविकलीच कशी हे पण प्रशासनाने पाहिले पाहिजे.यातपण मोठे गौडबंगाल आहे असे येथील नागरिकांचे म्हणणे आहे.तरी हा खोदलेला रस्ता खुला करून द्यावा अशी मागणी प्रशांत नगर भागातील नागरिकांनी केली आहे.केज नगर पंचायतीचे सिईओ, नगराध्यक्षा तसेच गटनेते व प्रशासनाने देखील तात्काळ हा प्रश्न सोडवणे आवश्यक आहे असे नागरिक मागणी करत आहेत.

# पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नवनाथ अण्णा शिरोळे यांच्या हस्ते कापडी पिशव्यांचे वाटप

### उपसरपंच गणेश लांडे यांच्याकडून प्लास्टिक मुक्तीचा निर्धार!

**बीड । प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या नामदार पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात पर्यावरणपूरक व जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आला. गणेश लांडे यांच्या पुढाकाराने व संकल्पनेतून राबवलेल्या या उपक्रमात कापडी पिशव्यांचे मोफत वाटप करून प्लास्टिक मुक्त बीड करण्याचा निर्धार करण्यात आला.या उपक्रमाचे उद्घाटन नवनाथ अण्णा शिरोळे यांच्या हस्ते पार पडले. कार्यक्रमाला बीड जिल्हा सचिव शांतिनाथ डोरले, अनिल चांदणे, राजू शहाणे, बाबूलाल डोरमारे, महादेव



नागरगोजे, नरेश पवार, राजेश चरखा, बाबुराव परळकर, प्रितताई कुकडेजा, शेख अम्मू, शेख मामू यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात बोलताना गणेश लांडे यांनी सांगितले की, पंकजाताई मुंडे यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन सेवा पंधरवडा अंतर्गत हा उपक्रम राबवला आहे. प्लास्टिकचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर करणे ही काळाची गरज आहे. पर्यावरण रक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेणे आवश्यक आहे.

नवनाथ अण्णा शिरोळे यांनी नागरिकांना मार्गदर्शन करत, पर्यावरणाची काळजी घेत प्लास्टिकच्या पर्यायांचा स्वीकार करा. कापडी पिशव्यांचा वापर हा छोटा बदल असला तरी भविष्यासाठी मोठा आहे, असे सांगितले.उपस्थित नागरिकांना मोफत कापडी पिशव्यांचे वाटप करून प्लास्टिकच्या घातक परिणामांची माहिती देण्यात आली. या उपक्रमाला बीडकरांनी चांगला प्रतिसाद दिला.सेवा पंधरवडा या उपक्रमांतर्गत राबवलेल्या या कार्यक्रमामुळे गणेश लांडे यांच्या पुढाकाराने बीड शहरात पर्यावरण संवर्धनाचा नवा संदेश दिला गेला आहे. प्लास्टिक मुक्तीच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल ठरले असून, पुढील काळात असे आणखी उपक्रम राबवले जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

# अभय जोशी यांचा सुरताल संगीत विद्यालया कडून विशेष सत्कार

**अंबाजीगाई । प्रतिनिधी**

दि.१९ जुलै २०२५ रोजी सुरताल संगीत विद्यालया कडुन अभय जोशी यांचा विशेष सत्कार करण्यात आला.अभय जोशी यांना नुकताच सूर महाराष्ट्र नाशिक यांच्याकडून मराठी गायन स्पर्धेसाठी चा विशेष सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला आहे.अभय जोशी हे वेगवेगळ्या क्षेत्रात उत्कृष्ठ कार्य करतात ते एक उत्तम गायक,विमा प्रतिनिधी, पत्रकार असून त्यांचे संघटनात्मक कार्य हि उल्लेखनीय आहे. सर्वच गायक आणि संगीत क्षेत्रातील प्रत्येकालाच मंच उपलब्ध होण्यासाठी साठी ते प्रयत्नशील असतात. या सर्व बाबी लक्षात घेउन सुरताल संगीत विद्यालयाचे अध्यक्ष सत्यवाजी शिंदे,पत्रकार राहुल देशपांडे,भागवत आचार्य यांनी अभय जोशी यांचा सत्कार केला.त्यासाठी अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077